जळगाव जिल्हा पोलीस
दनांक २४/०२/२०२५

-: प्रेस नोट :-

प्रति,

मा.संपादक ,

---------------

**जळगाव जिल्हयामध्ये परीक्षा केंद्रावर बाहेरुन कॉपी पुरविणा-या कॉपीबहादरांवर पोलीसांकडुन कारवाई**

--- ००० ---

दि.२१/०२/२०२५ रोजी पासुन इयत्ता दहावी च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षा सुरु झाल्या असल्याने परीक्षा केंद्रावर चोख बंदोबस्त ठेवुन शासनाचे कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत तसेच विदयार्थ्यांना बाहेरुन कॉपी पुरविणा-या इसमांवर कडक कारवाई करणेबाबत जिल्हा घटकात सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत.

मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे आदर्श कॉपीमुक्त अभियान दरम्यान निर्गमीत सुचनानुसार जळगाव जिल्हा घटकात खालीलप्रमाणे परीक्षाकेंद्रावर बाहेरुन विदयार्थ्यांना कॉपी पुरविणा-या कॉपी बहादरांवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११२/११७ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | पोलीस स्टेशन | कारवाई केलेल्या इसमांची संख्या | अ.क्र | पोलीस स्टेशन | कारवाई केलेल्या इसमांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पारोळा | २५ | ०७ | चाळीसगाव शहर | ०३ |
| ०२ | एरंडोल | १७ | ०८ | मुक्ताईनगर | ०३ |
| ०३ | यावल | १५ | ०९ | सावदा | ०३ |
| ०४ | धरणगाव | ०५ | १० | वरणगाव | ०१ |
| ०५ | भडगाव | ०२ | ११ | चोपडा ग्रामीण | ०१ |
| ०६ | चाळीसगाव ग्रामीण | ०२ | १२ | पाचोरा | ०२ |
| | **एकुण कारवाई** | **७९** | | | |

त्याचप्रमाणे **शनिपेठ पोलीस स्टेशन जळगाव येथे कॉपी पुरविणा-या ०३ इसमांवर महाराष्ट्र विदयापिठाच्या ,मंडळाच्या व इतर विनीर्दिष्ट परीक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ०७ व ०८ नुसार गुन्हा दाखल केला आहे.** तसेच परीक्षाकेंद्राबाहेर विनाकारण घुटमळणा-या तसेच फिरणा-या २० ते २५ इसमांना ताकीद देण्यात आली आहे.

तसेच यापुढे देखील परीक्षा दरम्यान गैरप्रकार करणारे तसेच विदयार्थ्यांना बाहेरुन कॉपी पुरविणा-या इसमांवर मोठया प्रमाणावर कारवाई करणेबाबत अधिनस्त पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांना मा.पोलीस अधीक्षक सो मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, यांनी आदेशीत केले आहे.

जन संपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव.